नसन - २
दस्त क्र. (२६५२)२०१८
१०/५३

लिहुन देणार संस्थेतर्फे कोणीही सभासद भविष्यात कोणतीही तक्रार याकामी उपस्थित करणार नाहीत. सदर मोबदला हा जरी फ्लॅट स्वरूपात असला तरी याबाबत लिहुन देणार यांना येणारे सर्व आजपावेतो घरपट्टी, पाणीपट्टी, लाईट बिल, सरकारी, निमसरकारी कर, कॅपिटल गेन, यदाकदाचित काही थकबाकी राहीली तर ती भरावयाची जबाबदारी वैयक्तिक सभासदाची राहील अथवा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांची जबाबदारी ही लिहुन देणार यांचीच राहणार आहे. तसेच सदर फ्लॅट धारक म्हणुन इमरतीमधील इतर फ्लॅट धारकांप्रमाणेच नियम व पोट नियमांचे पाल करण्याची जबाबदारी ही लिहुन देणार यांची राहणार आहे.

6. वर कलम 1 मध्ये नमुद केल्यानुसार लिहुन देणार यांना मोबदला म्हणुन दिलेल्या बांधीव क्षेत्राचे इलेक्ट्रीक मीटर, कॉमन पाणी मीटर व तत्सम येणारा सर्व खर्च हा लिहुन घेणार बिल्डर्स यांनी करावयाचा व सोसावयाचा आहे. तसेच लिहुन घेणार यांनी सदर दस्तासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्यानुसार सुखसुविधा ह्या लिहुन देणार यांना द्यावयाच्या आहेत.

7. सदर मिळकतीचे बांधकाम संदर्भात असे ठरले की ज्यावेळेस लिहुन देणार हे संपुर्ण सभासद इमारत खाली करून लिहुन घेणार बिल्डर यांच्या ताब्यात देतील त्यानंतर 18 (अठरा) महिन्याचे आत लिहुन घेणार विकसक यांनी सदर मिळकतीचे बांधकाम संपुर्ण सुखसोयीयुक्त परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे पुर्ण करून देण्याची ग्वाही दिली आहे. यदाकदाचित त्यानंतर उशीर झाल्यास एककम रूपये 4000/- दरमहा भाडे द्यावे लागेल सदर मिळकत विकसनाचा कालावधी हा बांधकाम साहित्याचा अभाव, नैसर्गिक आपत्ती, दुर्घटना, बांधकाम मजुरांचा अभाव झाल्यास इत्यादी कोणत्याही प्रकारची अशी घटना घडल्यास की ज्यामुळे बांधकाम होवु शकणार नाही, सदर बांधकामाची मुदत ही उभयतांचे संमतीने वाढविण्यात येईल. त्याकामाबाबत इतर कोणत्याही प्रकारचा मोबदला हा लिहुन देणार संस्था यांनी मागावयाचा नाही.

Scanned by CamScanner

-9-

नसन - २
दस्त क्र. (२८५२)२०१९
११ / ५३

8. सदर प्लॉटेड व त्यावरील फ्लॅट सदनिका यांचे मिळकत क्षेत्राचे टायटल हे निर्वेध व बिनबोजाचे असे असुन सदर मिळकत लिहुन देणार यांना प्राप्त हक्क व अधिकारानुसार कोठेही गहाण, दान, लिन, लिज, तारण नसून सदर प्लॉटेड व फ्लॅट मिळकत क्षेत्रावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्र हे लिहुन देणार यांना प्राप्त हक्क व अधिकारानुसार कोणसही कोणत्याही करारान्वये वा इतर कोणत्याही प्रकारचे दस्तान्वये लिहुन दिलेली नाही. तेसच सदर प्लॉटड मिळकत क्षेत्र कोणत्याही जडजोखमीत अडकविलेला नाही. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्राचा मालक म्हणुन कबजा हा लिहुन देणार यांचेकडेच आहे. तसेच लिहुन देणार हे वगळता इतर कोणहीही सदर मिळकतीस नाही. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्राविषयी कोणत्याही सरकारी वा निमसरकारी कार्यालयात वा कोर्टात वाद झालेले नाही. तसेच सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही कोर्टाचा मनाई हुकूम नाही. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्राबाबत कोणचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत आल्यास वा टायटलबाबत वर नमुद केलेल्या बाबीविषयी काहि वाद निर्माण झाल्यास त्याचे संपुर्ण निवारण लिहुन देणार हे पदरखर्चाने करून देतील. याकामी लिहुन घेणार यांना कोणत्याही प्रकारची तोषिस लागु देणार नाही.

9. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्राचा लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना खुला व निर्वेध असा कबजा जागेवर जावुन खाणाखुणा दर्शवुन विकसनाचे कार्यवाहीकामी परवानाधारक तत्वावर दिलेला आहे.

10. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्राचे विकसनाकामी लिहुन देणार यांचेकडुन जे जे वैयक्तिक सहकार्य लागेल, ते ते सहकार्य लिहुन देणार हे वेळोवेळी प्रत्यक्षपणे हजर राहुन लिहुन घेणार यांना देणार आहेत. लिहुन घेणार यांना विकसनाकामी काही परवानग्या मिळविण्यासाठी विलंब होवु नये यासाठी लिहुन देणार हे काळजी घेतील. तसेच लिहुन देणार हे स्वतः हजर राहुन त्या त्या गोष्टीची पुर्तता करून देतील. त्याकामी काहीही अडचण निर्माण करणार नाही वा तक्रार करणार नाही तसेच

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. ६०५२/२०१८
१२/५३

त्याकामी अथवा काही कार्यालयीन कामी विलंब लागु नये म्हणुन या दस्ताऐवजा सोबत लिहुन देणार संस्थेतर्फे यांनी त्यांचे जनरल मुखत्यारपत्र देवुन लिहुन घेणार यांना मुखत्यार म्हणुन नेमलेले आहे. सदरचे मखत्यारपत्र लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचे लाभात लिहुन दिलेले असल्यानो प्रस्तुतचे मुखत्यारपत्र हे लिहुन घेणार यांनी तसेच विकसक लिहुन घेणार यांचे हिश्याचे संपुर्ण फ्लॅट विक्री झाल्यानंतर अथवा विक्री केलेल्या फ्लॅटसची संपुर्ण रक्कम विकसक यांचे ताब्यात आल्यानंतर सदरहु मुखत्यारपत्र हे रितसर दस्तऐवजाव्दारे उभयपक्षी मे. सह दुय्यम निबंधक सो., वर्ग–II, नाशिक–... यांचे कचेरीत दोन्ही पक्षांनी दस्तऐवज रद्द करणेच्या दस्त करावयाचा आहे. एकतर्फी दस्तऐवज कोणहीही रद्द करावयाचा नाही तुमचे लाभात कधीही रद्द न होणारे असे दस्तऐवज लिहुन दिले असुन ते लिहुन देणार हे कधीही एकतर्फा रद्द करणार नाहीत.

11. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्र बिनशेतीकडे वर्ग झालेली असुन त्याकामी काही बदल करणे, मिळकतीवरील बांधकामचा नकाशा मंजुर करून घेणे, त्यामध्ये नियमानुसार येणारे सर्व बदल करणे, व इत्यादी सर्व कामे ही लिहुन घेणार यांनी करावयाची आहेत.

12. वर कलम 9 मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मिळकती ह्या लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना सदर प्लॉट मिळकतीचे मोबदल्यात बांधुन द्यावयाच्या आहेत. यदाकदाचित लिहुन देणार संस्थेच्या सभासदाला जर त्यांची मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करावयाची असेल तर त्याबाबत लिहुन घेणार यांचा काहीएक संबंध नाही मात्र लिहुन घेणार बिल्डर यांचे हिश्याला आलेल्या मिळकती विक्रीबाबत सभासदानी म्हणजेच लिहुन देणार संस्था यांनी कुठलीही अटी/शर्ती करावयाच्या नाहीत त्यापोटी लिहुन देणार यांचा काहीएक संबंध नाही. लिहुन घेणार यांनी त्या मिळकती संस्थेच्या परवानगीशिवाय इतर कोणासही विक्री करून रक्कमा घ्यावयाच्या आहेत व त्यांची करतऐवजे सह्या करून दस्तऐवजे

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. (२६५२)२०१८
२३ / ५२

मे. सह दुय्यम निबंधक सो., वर्ग–II, नाशिक–.... यांचे कचेरीत नोंदणी करून द्यावयाची आहेत.

13. सदर प्लॉट मिळकत क्षेत्र बांधकामासाठी वापरावे, त्यावर बांधकामे करावीत, लिहुन घेणार यांचे लाभातील बांधीव भाग विक्री करावेत. त्यासाठी तिऱ्हाईतांबरोबर करार मदार करावे. येणाऱ्या रक्कमा लिहुन घेणार यांनी ठेवुन घ्यावयाच्या आहेत त्या रक्कमांशी लिहुन देणार यांचा कोणताही संबंध राहणार नाही. सदरचे करार लिहुन घेणार यांनी तिऱ्हाईतांचे लाभात लिहुन व नोंदवुन दयावेत. त्यापोटी भरणा रक्कमा स्विकाराव्यात. त्याबाबत संस्थेचा व लिहुन घेणार यांचा काहीएक संबंध राहणार नाही.

14. सदर प्लॉटेड मिळकत क्षेत्र लिहुन घेणार यांना विकसनासाठी दिल्याबद्दल लिहुन देणार यांना लिहुन घेणार यांनी मोबदल्यापोटी ठरविण्यात आलेले बांधीव क्षेत्र अदा करावयाचे आहे. वर करारात नमुद केलेले बांधीव क्षेत्र वगळता अन्य कोणतीही रक्कम लिहुन देणार यांना लिहुन घेणार यांचेकडुन नफ्यापोटी अथवा मिळकतीचे किंमतीपोटी घेण्याचे नाही अगर मागावयाची नाही. परंतु सदर स्किम करताना यदाकदाचित लिहुन घेणार यांना कोणत्याही प्रकारचा तोटा झाल्यास त्याची काहीएक जबाबदारी ही लिहुन देणार यांचेवर राहणार नाही.

15. सदर प्लॉट मिळकत क्षेत्र लिहुन घेणार यांना लिहुन देणार यांनी विकसनासाठी दिलेले असल्यामुळे यापुढे रेव्हेन्यु खात्याबरोबर अगर अन्य कोणत्याही सरकारी खात्याबरोबर अगर तत्संबंधी नाशिक महानगरपालिका, अगर अन्य ऑफिसेस यांचे बरोबर लिहुन देणार यांनी येथुन पुढे कोणताही पत्र व्यवहार लिहुन घेणार यांचे हिताविरुध्द असा परस्पर करावयाचा नाही. सदर प्लॉट मिळकत क्षेत्राबाबत जो जो पत्र व्यवहार सदर ऑफिसेस कडुन लिहुन देणार यांचेकडे येईल तो लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना द्यावयाचा आहे व त्याची पुढील कारवाई लिहुन घेणार यांनी करावयाची आहे. उपरोक्त प्लॉट मिळकती क्षेत्रावरील

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. ६०७२/२०१८
१४/५३

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASHIK-3

विकसनासंबंधाने, त्यावरील बांधकामासाठी सर्व कार्यवाही लिहुन घेणार हे करणार आहेत त्यासाठी जरूर ते पत्र व्यवहार करणेचे हक्क व अधिकार लिहुन घेणार यांना दिलेले आहेत. सदरचे विकसन करारानुसार लिहुन घेणार यांना उपरोक्त प्लॉट मिळकत क्षेत्र व त्याबाबतचे सर्व हक्क, अधिकार दिले आहेत. यदाकदाचित सरकारी धोरणात बदल झाल्याने, कायद्यामध्ये बदल झाल्याने अगर कोणत्याही कारणास्तव सदर बांधकामाबाबत जे काही फायदे तोटे होतील, ते लिहुन घेणार यांनी सोसावयाचे आहेत.

16. उपरोक्त प्लॉटेड मिळकत क्षेत्रावरील बांधीव क्षेत्रापैकी लिहुन घेणार यांना राहणार असलेल्या बांधीव क्षेत्राबद्दल लिहुन घेणार यांनी तिऱ्हाईत इसमांबरोबर, संस्थेबरोबर विक्रीचे करारमदार करावेत, त्याच्या अटी व शर्ती ठरवाव्यात व त्यापोटी रक्कमा स्विकाराव्यात, त्यांना पावत्या दयाव्यात आणि बांधीव भाग लिहुन घेणार यांनी तिऱ्हाईत इसमांस अगर संस्थेस वर्ग करून दयावी.

17. सदर मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला प्रस्तुत विकसन करारनाम्याची नोंद इतर अधिकारात घ्यावयास लिहुन देणार संस्थेतर्फे याच दस्तान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

18. प्रस्तुत करारनाम्याप्रमाणे उपरोक्त प्लॉटेड मिळकत क्षेत्र लिहुन घेणार यांनी विकसनासाठी घेतलेले आहे. त्यासाठी लिहुन घेणार यांना बरीच कामे करावी लागतील व ती कामे करतांना वेळोवेळी लिहुन देणार यांच्या सहया, संमतीची गरज भासेल. परंतु लिहुन देणार हे वेळोवेळी प्रत्येक ठिकाणी हजर राहु शकत नाही म्हणुन लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना लिहुन देणार यांचेवतीने कामे करण्यासाठी लिहुन देणार यांचे मुखत्यार म्हणुन या दस्तऐवजासोबत स्वतंत्र दस्तऐवजाव्दारे नेमले असुन पुढील प्रमाणे कामे करण्याचे हक्क, अधिकार लिहुन घेणार यांना दिलेले आहेत. ती कामे करण्यासाठी जो काही खर्च होईल तो लिहुन घेणार यांनी करावयाचा व सोसावयाचा आहे.

Scanned by CamScanner

नसन - २
नसत क्र. (२६५२)२०१८
२५/५३

मात्र त्यासाठी लिहुन देणार यांचेकडुन जे जे सहकार्य लागेल, ते ते सहकार्य लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना द्यावयाचे आहे.

19. सदरील सदनिकांवर संस्थेच्या सभासदांनी कर्ज घेतले तर सदरील कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी वैयक्तिक सभासदांची अथवा सदनिका धारकाची राहील.

20. सदर मिळकती विकसित करताना सरकारी धोरणांप्रमाणे मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे अॅक्विझीशन होवुन त्याबदल्यात एफ.एस.आय. (F.S.I.) अथवा जादा एफ.एस.आय. मिळाल्यास त्यासंबंधी योग्य ती कार्यालयीन पुर्तता करून सदरचा एफ.एस.आय. मंजुर करून घेणे. तसेच नुकसान भरपाई मिळाल्यास त्याकामी योग्य ती कारवाई करणे व ती नुकसान भरपाईची रक्कम स्विकारणे. सदर एफ.एस.आय. हा लिहुन घेणार यांना बांधकामासाठी वापरता येणार असुन सदर बांधीव क्षेत्र हे लिहुन घेणार यांनी त्यांचेकडेच मोबदला म्हणुन ठेवावयाचे आहे. सदर मिळकतीवर यदाकदाचित वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास लिहुन घेणार यांना संस्थेची परवानगी घ्यावी लागेल व वाढीव बांधकामाचा मोबदला हा लिहुन घेणार व लिहुन देणार यांना समप्रमाणात राहिल.

21. उपरोक्त मिळकती विकसीत करणेकामी लिहुन देणार यांना मोबदला म्हणुन दयावयाचे बांधीव क्षेत्र वगळता लिहुन घेणार यांना राहणारे उर्वरित बांधीव क्षेत्र हे तारण देवुन आवश्यकता भासल्यास वित्तीय संस्थेकडुन याकामी कर्ज काढणेकामी आवश्यक असणारे अर्ज भरून देणे, त्यासाठी आवश्यक असणारे प्रतिज्ञापत्र भरून देणे. तसेच बँकेच्या इतर हमीपत्रावर व इतर कागदपत्रांवर मिळकत मालक म्हणुन लिहुन देणार यांचेवतीने सहया करणे, गहाणपत्र लिहुन देताना सदर मिळकत ही दुय्यम तारण म्हणुन गरज असल्यास गहाण ठेवणे, सदरचे गहाणखत तमे दुय्यम निबंधक साहेब यांचे कार्यालयात हजर राहुन कबुल करून नोंदवुन देणे, गहाणखतावर लिहुन देणार यांचेवतीने सहया करणे, कर्जाची रक्कम स्विकारणे, सदर गहाणखतातील मजकुर मान्य व कबुल करणे, कर्जाची

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. (२६५२)२०१८
१६/५३

रक्कम स्विकारणे, सदर गहाणखतातील मजकुर मान्य व कबुल करणे, इतर सर्व आवश्यक ती कामे लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांचेवतीने व लिहुन देणार यांचेकरीता करणे. परंतु सदर कर्जफेडीची पुर्ण जबाबदारी ही विकसनकार म्हणुन लिहुन घेणार यांचीच राहणार आहे.

22. सदर वर कलम 1 यात नमुद केलेल्या सोसायटीमधील फ्लॅट मिळकतीपैकी फ्लॅट नं. 9 चे सभासद श्री. कांतीलाल नयनसुख मुथा यांचेवर आजमितीस महावीर नागरी सहकारी पतसंस्था लि., नाशिकरोड शाखा यांचेकडे कर्जाकामी गहाण दिलेले असुन या व्यतिरीक्त कोठेही गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र ई. जडजोखीमीत गुंतलेली नाही. सदरील मिळकत ही महावीर नागरी सहकारी पतसंस्था लि., नाशिकरोड शाखा यांचे कर्जा व्यतिरीक्त निर्वेध व बिनबोजाची अशी आहे. सदरहु कर्जाची परतफेड करण्याची श्री. कांतीलाल नयनसुख मुथा यांची जबाबदारी राहील.

23. सदर वित्तीय सस्थेचे अथवा बँकेचे कर्जाची परतफेड झाल्यानंतर गहाणमुक्त लेख लिहुन घेणे, त्याप्रमाणे सदर गहाणमुक्त लेख नोंदविणेकामी लिहुन घेणार, लिहुन देणार म्हणुन गहाणमुक्त लेखावर सही करणे, सदर गहाणमुकत लेख नोंदविणेकामी मे. सह दुय्यम निबंधक सो., वर्ग-।।, नाशिक-..... यांचे कार्यालयात हजर राहुन कबुल करून नोंदवुन मे. सह दुय्यम निबंधक सो., वर्ग-।।, नाशिक-.... यांचे कार्यालयात हजर राहुन कबुल करून नोंदवुन घेणे तसेच इतर आवश्यक ती सर्व कामे करणे.

24. सदर मिळकतीचे क्षेत्र अथवा त्यातील बांधीव भाग यांस खरेदी घेणाराची नावे लावुन देणे, त्यासाठी अर्ज देणे, नोटीसा स्विकारणे, जाबजबाब देणे तसेच इतर आवश्यक ती सर्व कामे करणे.

25. वर वर्णन केलेल्या मिळकत क्षेत्रावरील बांधीव भागाचे कब्जे मिळकत विकत घेणाऱ्यांस हस्तांतरीत करून घेणाऱ्यास अथवा डेव्हलपर्स यांना देणे, त्याकरीता व लिहुन देणार यांचे वतीने सह्या करणे.

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. (२६५२)२०१८
१७/ ५३

26. सदर मिळकतीच्या ठिकाणी इमारत बांधकामासाठी सरकारकडुन नियंत्रित भावामध्ये सिमेंट, लाकुड, लोखंड वगैरे साहित्य मिळत असल्यास त्यासाठी अर्ज करणे, त्याचा कोटा मंजुर करुन घेणे व त्या गोष्टी मिळवुन देणे.

27. सदर मिळकतींवरील लिहुन घेणार यांना मिळणारा फ्लॅट मिळकतींबाबत फ्लॅट खरेदी घेणार यांना वित्तीय संस्थेकडुन कर्ज घ्यावयाचे असल्यास फ्लॅट खरेदी घेणार यांचे कर्ज प्रकरणाकामी ना हरकत दाखला व संमती देणे.

28. सदर मिळकत क्षेत्रासंबंधाने कोणत्याही प्रकारचे वाद उत्पन्न झाल्यास त्याचे निवारण करणे, गरज पडल्यास त्यासाठी दिवाणी, फौजदारी, रेव्हेन्यु, महानगरपालिका, अगर अन्य न्यायालये, ऑफिसेस यांचेकडे दावा, अपिल, रिव्हीजन, रिट पिटीशन, अर्ज, वगैरे दाखल करणे, त्यावर सह्या करणे, समक्ष हजर राहणे, काही दिवाणी स्वरुपाची कारवाई झाल्यास त्याचे समन्स, नोटीसा, रिटस स्विकारणे, कोर्टात समक्ष हजर राहणे, जाबजबाब देणे, कॅफियत दाखल करणे, प्रतिज्ञापत्र वगैरे दाखल करणे, अर्जांना जबाब देणे, त्यावर सह्या करणे, समझोता पुरसिस दाखल करणे, त्यावर सह्या करणे याकामी मे. कोर्टात हजर राहुन समझोता पुरसिस मधील मजकुर मान्य करणे. लिहुन देणार यांचेकरीता व लिहुन देणार यांचे वतीने दाखल केलेला दावा, अपिल मागे घेणे, कोणत्याही अर्जावरील आदेशाविरुध्द तसेच दाव्याचे निकालाविरुध्द वरीष्ठ कोर्टात अपिल रिव्हिजन, रिव्ह्यु, रिट पिटीशन व इतर प्रोसेडिंग दाखल करणे.

29. उपरोक्त कोर्ट कारवाई साठी वकिल, बॅरिस्टर्स यांची नेमणुक करणे, त्यांचे वकिल पत्रावर सह्या करणे, फि देणे.

30. कोर्ट कारवाईकामी झालेल्या हुकुमावरुन दरखास्ती दाखल करणे, त्यावर सह्या करणे, कब्जे वॉरंटस मिळविणे व बजावणे, दरखास्त काढुन घेणे

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. ६८३१/२०१८
९८/५३

इत्यादी सर्व कामे लिहुन देणार यांचेकरीता व लिहुन देणार यांचेवतीने करणे.

31. वर वर्णन केलेल मिळकतीचे क्षेत्र विकसीत करण्याच्या दृष्टीने, तसेच लिहुन देणार यांचे मोबदला म्हणुन मिळणारे बांधीव क्षेत्र व त्याकामी लागणारे तळ जागा क्षेत्र वगळता इतर तळजागा क्षेत्र व बांधीव क्षेत्र हे विक्री करण्याचे दृष्टीने जी जी कारवाई करणे भाग पडेल ती ती सर्व प्रकारची कारवाई करणे, तसेच मिळकत डेव्हलपमेंटकामी अगर विक्रीकामी ज्या ज्या परवानग्या नाशिक महानगरपालिका, महसुल खाते, इन्कम टॅक्स खाते, अगर अन्य संबंधीत अधिकारी, ऑफिसेस यांच्याकडुन घ्याव्या लागतील त्या त्या सर्व परवानग्या लिहुन देणार यांचेकरीता त्यांचेवतीने मिळविणे, त्यासाठी अर्ज करणे, त्यावर लिहुन देणार यांचेकरीता व लिहुन देणार यांचेवतीने सह्या करणे, जाब जबाब देणे, पुरावे सादर करणे, आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करणे, समक्ष हजर राहणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, जरूर पडल्यास आदेशाच्या अथवा निकालाचे विरूध्द वरिष्ठ कोर्टात दाद मागणे, इंडेमनिटी बॉण्ड वगैरे दस्तऐवज करून देणे व योग्य ती सर्व पुर्तता करून आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविणे.

32. वरीलप्रमाणे अधिकारांनुसार लिहुन घेणार हे जी जी कामे, कारवाई करतील ती ती सर्व कामे, कारवाई लिहुन देणार यांना मान्य व कबुल राहतील. तसेच वरीलप्रमाणे कामे करण्यासाठी काही अधिकार देण्याचे राहुन गेलेले असल्यास ते अधिकारही आम्ही तुम्हांस दिले आहेत, असे समजले जाईल व ती लिहुन घेणार यांनी केलेली कामे लिहुन देणार यांना मान्य व कबुल राहतील. तसेच प्रस्तुतचे दस्तासोबत लिहुन व नोंदवुन दिलेले मुखत्यारपत्र हे कधीही रद्द न होणारे असे राहणार असुन लिहुन देणार यांचेवर तसेच लिहुन देणार यांचे वालीवारसांवर तसेच लिहुन देणार यांचेतर्फे हक्क सांगणार यांचेवर बंधनकारक राहतील.

33. याप्रमाणे लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांचेकरीता व लिहुन देणार यांचेवतीने कामे करावीत, दस्तऐवज लिहुन द्यावेत,

Scanned by CamScanner

नसन - २
दस्त क्र. ६८५८/२०१८
५८/५३

लिहुन घेणार यांनी केलेली सर्व कामे लिहुन देणार यांनी स्वतः हजर राहुन केलेली आहेत असे समजले जाईल व ती लिहुन घेणार यांनी केलेली कामे लिहुन देणार यांना मान्य व कबुल राहतील. तसेच प्रस्तुतचे दस्ताऐवज लिहुन देणार यांना मान्य व कबुल असेतील तसेच लिहुन देणार यांचेकरीता व यांचेवतीने हक्क सांगणार यांचेवर बंधनकारक राहतील.

34. लिहुन देणार हे या दस्ताव्दारे जाहीर करतात की, उपरोक्त मिळकत क्षेत्रांवर येथुन पुढे लिहुन देणार कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करणार नाही व लिहुन देणार यांचेकडुन करारासाठी मिळकत कायम, सतत निर्वेध व बिनबोजाची ठेवतील. सदर मिळकत क्षेत्रांचे तुम्हांस विकसनास कोणत्याही प्रकारे हरकत अडथळे येवु देणार नाही.

35. नियोजित इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर 3 वर्षापर्यंत यदाकदाचित बांधकामामध्ये काही दोष आढळला तर त्याचे निवारण रिपेरिंग लिहुन घेणार (बिल्डर) हे स्वखर्चाने करून देतील त्याची तोशिष लिहुन देणार संस्थेस लागु देणार नाही.

36. प्रस्तुत करारासोबत आम्ही तुमचे भोगवटयास आवश्यक ते सर्व कागदपत्रे दिलेली आहेत.

37. सदर मिळकत क्षेत्रांचे विकसनाकामी अथवा करारातील मजकुराकामी कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद हा पथमतः लवाद कायद्याचे तरतुदीनुसार लवादाची नेमणुक करून लवादामार्फत संपुष्टात आणावयाचा असल्याचे उभयपक्षांत ठरविण्यात आलेले आहे. त्याकामी लवादाचे कार्यवाहीकामी कार्यक्षेत्र हे नाशिकरोड राहणार आहे.

38. प्रस्तुतचा करारनामा हा लिहुन देणार यांचेवर, लिहुन देणार यांचे वालीवारसांवर तसेच लिहुन देणार यांचेतर्फे हक्क सांगणार यांचेवर बंधनकारक राहणार आहे.

Scanned by CamScanner

नसल - २
दस्त क्र. (६६५२)/२०१८
२०/९३

39. सदर मिळकतीचे विकसनाव्दारे लिहुन देणार संस्थेस मिळणारा बांधीव मोबदला क्षेत्र 802.72 चौरस मिटर्स (रेरा कारपेट+टेरेस+बाल्कनी) असे होत असुन त्यांस बांधकाम दर रक्कम रूपये 22,000/- ने आकारणी करून मोबदला रक्कम रूपये 2,11,92,000/- इतकी येते आहे. तसेच विकास शुल्क रक्कम रूपये 3,96,900/- असा आहे.

40. **दस्तऐवज खर्च :-**

सदर दस्तऐवजाचा सर्व खर्च जसे की स्टॅम्प खर्च, नोंदणी फी, वकील फी, टायपिंग खर्च, झेरॉक्स, लिहीणावळ इत्यादी खर्च हा तुम्ही तुमचा केलेला व सोसावयाचा आहे.

येणेप्रमाणे सदरचे विकसन करारनामा आजरोजी राजीखुशीने, स्वसंतोषाने, लिहुन, वाचुन घेवुन, समजावुन घेवुन साक्षीदारांसमक्ष खाली सही करून दिला असे.



प्र. शां. संघवी

गितांजली को.ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.
नाशिकरोड तर्फे 1) चेअरमन
श्रीमती प्रमिला शांतीलाल संघवी



S.K. Navander

2) सेक्रेटरी
श्री. सुरेश काशिनाथ नावंदर

Scanned by CamScanner

नसन - 19 - २

दस्त क्र. 2692 /२०१८

२१ / ४३

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASHIK-2



MPatil

3) व्यवस्थापक समीती सदस्य
सौ. मीरा भगवान पाटील
(लिहुन देणार)



R.Karnavat

आर व्ही कर्नावट तर्फे प्रो.
सौ. रूपाली विनय कर्नावट
(लिहुन घेणार)

साक्षीदार :

1) Anish.R. Wagh.

2) B.T. Patil

Scanned by CamScanner